आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३० वाजता

१४ नोव्हेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्राच्या विकासाला महायुतीचं प्राधान्य असून महाराष्ट्र विकसित भारताचं ग्रोथ इंजिन होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- केंद्र सरकार आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवत असल्याचा राहुल गांधी यांचा नंदुरबारच्या प्रचारसभेत आरोप
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय पुरस्कार यंदा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंग पवार यांना जाहीर
- भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांचं निधन

  **आणि**

- महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत भारताचा थायलंडवर १३-० असा विजय

**<><><><><>**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी येत्या सोमवारपर्यंतच वेळ राहिल्यानं सर्व पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध आश्वासनं देण्यात येत आहेत तसंच एकमेकांवर आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यात तीन प्रचारसभा घेतल्या.

महाराष्ट्राचा विकास हीच महायुतीची प्राथमिकता असून महाराष्ट्र विकसित भारताचं ग्रोथ इंजिन होईल, असं प्रतिपादन मोदी यांनी खारघर इथल्या प्रचारसभेत केलं. यावेळी त्यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकारनं केलेल्या कामाचा आढावा घेतला. केंद्र सरकारन दहा वर्षांत २५ कोटी लोकांना गरीबी रेषेच्या वर काढलं, चार

कोटी बेघर लोकांना घर दिलं, जलजीवन मिशनद्वारे बारा कोटी घरांना पाणी दिलं, बारा कोटी गरीबांच्या घरी शौचालय बनवलं असं मोदी यांनी सांगितलं. त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेस गरीबविरोधी आहे, असं मोदी म्हणाले….

**होल्ड-- बाईट--प्रधानमंत्री**

त्याआधी मोदी यांनी **छत्रपती संभाजीनगर** इथल्या प्रचारसभेला संबोधित केलं. महाराष्ट्राला विकसित भारताचं नेतृत्व करायचं असून त्यादृष्टीनं राज्यात अनेक अत्याधुनिक पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती दिली जात आहे, असं ते यावेळी म्हणाले. मराठवाड्यातला पाणीप्रश्न सोडवण्यासाठी महाविकास आघाडी सरकारनं काहीही केलं नाही, उलट महायुती सरकारच्या काळात सुरू केलेल्या योजना बंद पाडल्या, अशी टीका त्यांनी केली.

**मुंबई**मध्ये शिवाजी पार्क इथं नरेंद्र मोदी प्रचारसभेला संबोधित करत आहेत.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या धोरणनिर्मितीत आदिवासी अधिकाऱ्यांना मर्यादित अधिकार असून आदिवासी समुदायाला संसाधनापासून दूर ठेवलं जातं, असा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी केला. ते आज नंदुरबार इथं प्रचारसभेत बोलत होते. देशात आदिवासींची लोकसंख्या ८ टक्के आहे, मात्र त्यांना सोयी सुविधा नाकारल्या जातात. ही परिस्थिती बदलायची असेल तर जातनिहाय जनगणना करावी लागेल, असं गांधी म्हणाले. प्रत्येक समुदायाच्या संख्येनुसार त्यांची भागीदारी सुनिश्चित केली जाईल, आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा काढून टाकली जाईल, शेतकऱ्यांचं तीन लाखापर्यंतचं कर्ज माफ केलं जाईल, महालक्ष्मी योजने अंतर्गत महिलांना दरमहा तीन हजार रुपये दिले जातील, २५ लाखापर्यंतचा

आरोग्य विमा दिला जाईल, अडीच लाख सरकारी नोकऱ्या दिल्या जातील, अशी आश्वासनं राहुल गांधी यांनी दिली.

राहुल गांधी प्रत्येक सभेत संविधानाची प्रत दाखवतात यावरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या टीकेला गांधी यांनी या सभेत प्रत्युत्तर दिलं.....

**होल्ड--बाईट--(राहुल गांधी)**

राहुल गांधी यांनी आज नांदेड इथंही प्रचारसभा घेतली. केंद्र सरकार जर कोट्यधीशांना पैसे देतं, तर महाराष्ट्रातले शेतकरी, युवा, कष्टकऱ्यांना पैसे देण्याचा निर्धार इंडिया आघाडीनं केला आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><>**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नाशिक जिल्ह्यात इगतपुरी इथं प्रचारसभा घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भाजपानं महाराष्ट्राच्या जनतेला खोटी आश्वासनं दिल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. देशातली सर्व विकासकामं आपल्याच कार्यकाळात झाल्याचा दावा प्रधानमंत्री करतात, पण देशाच्या विकासाचा पाया माजी प्रधानमंत्री दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रचला, असं ते म्हणाले. दिवंगत प्रधानमंत्री इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी देशासाठी बलिदान दिलं, मात्र मोदी यांनी त्यांचा अपमान केला, असंही ते म्हणाले.

या निवडणुकीत महाविकास आघाडी सरकारच्या हातात राज्य द्या, आम्ही विकासाचं बजेट देऊ, असं आश्वासन खर्गे यांनी आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलताना दिलं.

**<><><><><>**

ही विधानसभा निवडणूक जनतेच्या भवितव्याचा निर्णय करणारी निवडणूक आहे, असं प्रतिपादन भाजपा नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. ते धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर मतदारसंघातल्या प्रचारसभेत बोलत होते.

देशातली गरीबी, बेरोजगारी दूर व्हायला हवी, स्मार्ट शहरांप्रमाणेच स्मार्ट खेडी उभारली गेली पाहिजेत, देश पाच ट्रिलिनय अर्थव्यवस्था बनला पाहिजे तरच देश विश्वगुरू होईल, असं गडकरी म्हणाले. गडकरी यांनी आज सांगलीमधेही सभा घेतली.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यात श्रीगोंदा आणि नेवासे अशा दोन ठिकाणी जाहीर सभा झाल्या. राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर पाच जीवनावश्यक वस्तुंचे दर स्थिर ठेवले जातील. मुलांना मोफत शिक्षण त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितलं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मुढीकोठा इथं जाहीर सभा झाली. महायुतीचं शेतकरीविरोधी सरकारला पराभूत करुन राज्यात बळीराजाचे राज्य आणण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

राज्यात सध्या बेरोजगारीचा प्रश्न खूप मोठा असून, महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर प्रत्येक बेरोजगाराला नोकरी मिळेपर्यंत दर महिन्याला चार हजार रुपये बेरोजगारी भत्ता देण्याचं आश्वासन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज दापोली इथल्या  प्रचार सभेत दिलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार हरिश्चंद्र देवराम चव्हाण यांच्या पार्थिवावर सुरगाणा तालुक्यात प्रतापगड या त्यांच्या मूळगावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. हरिश्चंद्र चव्हाण यांचं आज नाशिकमधल्या त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. नाशिक शहरातल्या अनेक मान्यवरांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं.

२५ डिसेंबर १९५२ मधे जन्मलेले चव्हाण यांनी ग्रामपंचायत सदस्य म्हणून कारकिर्दीला प्रारंभ केला. १९९५ मधे ते सुरगणा पेठ मतदारसंघातून अपक्ष म्हणून विधानसभेवर निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी भाजपाच्या तिकिटावर लोकसभेत मालेगाव आणि दिंडोरी मतदारसंघांचं मिळून सलग तीनवेळा प्रतिनिधित्व केलं. आदिवासींचे प्रश्न सोडवण्यात त्यांनी नेहमी पुढाकार घेतला.

**<><><><><>**

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी समाजाचे योगदान महत्त्वाचे असून भगवान बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली लढला गेलेला संघर्ष येणाऱ्या काळात प्रेरणादायी असेल असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे.

जनजातीया गौरव दिवसांनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज देशवासीयांना संदेश दिला. देशाच्या परंपरेत आदिवासी समुहाचे योगदान महत्वाचे असून सध्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवल्या जात असल्याचंही त्या म्हणाल्या. देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे आणि त्यातही महिलांचे योगदानही महत्त्वाचे आहे असेही त्या म्हणाल्या. आदिवासी समाज विकसित झाल्यास देशाचा विकास होईल असंही त्यांनी यावेळी सांगितलं. हा दिवस देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी समाजाचं नेतृत्व केलेल्या भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो.

**<><><><>**

देशाचे पहिले प्रधानमंत्री दिवंगत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त देश आदरांजली वाहत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेहरु यांना आदरांजली वाहणारा संदेश समाजमाध्यमावर प्रसिद्ध केला आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मुंबईत राजभवन इथं पंडित नेहरुंच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. राजभवनातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील पंडित नेहरु यांना आदरांजली वाहिली आहे.

पंडित नेहरु यांच्या जन्मदिनी बालदिन साजरा केला जात असून विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या सातारा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

बिहारमधे सुरु असलेल्या, महिलांच्या आशियाई हॉकी करंडक स्पर्धेत आज भारतानं थायलंडवर १३-० असा विजय मिळवला. भारतातर्फे दिपीकानं चमकदार कामगिरी करत ५ गोल नोंदवले. प्रिती दुबे, लालरेमसियामी आणि मनिषा चौहान या तिघींनी प्रत्येकी दोन गोल केले. या स्पर्धेतला भारताचा हा सलग तिसरा विजय आहे. भारताचा यानंतरचा सामना चीनशी होणार आहे.